CMYK

■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 76 ■ शुक्रवार,25 एप्रिल 2025 ■ RNI NO.-2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू. 5

दैनिक

# आरंभ मराठी

arambhmarathi535@gmail.com

**उद्या अंक नाही**

दैनिक आरंभ मराठी कार्यालयाला शुक्रवार,दिनांक २५ एप्रिल २०२५ रोजी सुट्टी असल्याने शनिवार,दिनांक २६ एप्रिल चा अंक प्रसिद्ध होणार नाही,याची वाचक,जाहिरातदार, वितरकांनी नोंद घ्यावी.
– संपादक, दैनिक आरंभ मराठी



**जमीन भेगाळली, पाणी आटले; उन्हाळ्याने रौद्र रूप धारण केले**

>> सविस्तर वृत्त पान ४

# धाराशिवच्या बस स्थानकाचा वनवास संपणार, महाराष्ट्र दिनापासून नवीन स्थानक प्रवाशांच्या सेवेत

■ पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते होणार उद्घाटन, स्थानकातील कामे अंतिम टप्प्यात
■ ३० एप्रिलला तुळजापूर येथील तर १ मे ला धाराशिव येथील बसस्थानकाचे होणार उद्घाटन

आरंभ मराठी । धाराशिव

**वारंवार उद्घाटन करून देखील कामाला विलंब लागलेल्या धाराशिवच्या बस स्थानकाचा वनवास अखेर संपला असून, नूतनीकरण झालेल्या सुसज्ज नवीन बस स्थानक महाराष्ट्र दिनी अर्थात १ मेपासून प्रवाशांच्या सेवेत येणार आहे. पालकमंत्री तथा राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते या बसस्थानकाचे उद्घाटन करण्यात येणार आहे. तसेच तुळजापूर येथील नूतनीकरण करण्यात आलेल्या जुन्या बस स्थानकाचे देखील उद्घाटन ३० एप्रिल रोजी पालकमंत्री यांच्या हस्ते होणार आहे. या दोन बस स्थानकामुळे धाराशिव आणि तुळजापूर शहराच्या सौंदर्यात भर पडणार असून, प्रवाशांच्या सेवेसाठी दोन्ही शहरातील भव्य इमारती दाखल होणार आहेत.**









धाराशिव येथील बस स्थानकाचे बांधकाम कधी पूर्ण होणार याकडे डोळे लावून बसलेल्या नागरिकांची प्रतीक्षा आता संपणार असून, आठ दिवसात नवीन बस स्थानक प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार आहे. तब्बल दहा कोटी रुपये खर्च करून बस स्थानकाचे बांधकाम पूर्ण करण्यात आले असून, सध्या रंगरंगोटी आणि इतर कामांवर शेवटचा हात मारला जात आहे. या बस स्थानकात सोलापूर बस तळाकडे ११ फलाट आणि लातूर बस तळाकडे ११ फलाट असे एकूण २२ फलाट आहेत. यासोबत सुसज्ज कँटीन, जेनेरिक मेडिकल, पार्सल ऑफिस, रिझर्व्हेशन ऑफिस, कंट्रोल केबिन, स्थानक प्रमुख ऑफिस, हिरकणी कक्ष, पोलीस चौकी, महिलांसाठी व पुरुषांसाठी स्वतंत्र प्रसाधन गृह, पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. एकाच वेळी १०० चालक–वाहक विश्रांती करू शकतील असे पुरुषांसाठी व महिलांसाठी स्वतंत्र दोन हॉल आणि अधिकाऱ्यांसाठी दोन सुसज्ज विश्रांतीगृह देखील यामध्ये बांधण्यात आले आहेत. या बस स्थानकाचे उद्घाटन १ मे रोजी दुपारी १ वाजता पालकमंत्री आणि परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते होणार आहे. मागील दीड वर्षांपासून धाराशिव येथील बस स्थानकाचे बांधकाम सुरू होते ते पूर्ण झाले असून, सध्या रंगरंगोटी आणि इतर छोटी कामे करण्यात येत आहेत. जिल्ह्याच्या सौंदर्यात भर टाकणारे बस स्थानक तब्बल दहा कोटी रुपये खर्च करून बनवण्यात आले आहे. ऑगस्ट २०२३ मध्ये यासाठी निधी मंजूर करण्यात आल्यानंतर बस स्थानकाच्या बांधकामास सुरुवात करण्यात आली होती. नियोजित वेळेत बांधकाम पूर्ण होत नसल्यामुळे प्रवाशांना पावसाळ्यात प्रचंड त्रास सहन करावा लागला होता. पालकमंत्री प्रताप सरनाईक हे तीन महिन्यांपूर्वी धाराशिव दौऱ्यावर आले असता, त्यांनी बस स्थानकाच्या बांधकामाचे काम वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानंतर कामाचा वेग वाढला होता. आता बस स्थानकाचे संपूर्ण काम पूर्ण झाले असून, ते प्रवाशांच्या सेवेत दाखल होण्यासाठी तयार आहे.

छाया : आरिफ शेख

## तुळजापूर बस स्थानकाचेही उद्घाटन

तुळजापूर येथील जुन्या बस स्थानकाचे देखील नुतनीकरण करण्यात आले असून, मुख्य रस्त्यावर आकर्षक आणि भव्य बस स्थानक उभे करण्यात आले आहे. तुळजापूर येथील बस स्थानकासाठी सुरुवातीला ३.६१ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला होता. परंतु, हा निधी अपुरा असल्यामुळे तुळजापूरचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी प्रयत्न करून वाढीव ३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून आणला होता. तब्बल ६ कोटी ७२ लाख रुपये खर्चून तुळजापूरच्या बस स्थानकाचे रूप बदलले असून, यात्रा काळात बस स्थानकात गर्दी होणार नाही अशाप्रकारे त्याचे बांधकाम करण्यात आले आहे. याचे उद्घाटन ३० एप्रिल रोजी दुपारी तीन वाजता पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते होणार आहे.

## दिवंगत विद्यार्थिनी वर्षा खरातच्या कुटुंबीयांना संस्थेकडून एक लाख रुपयांची सांत्वनपर मदत



आरंभ मराठी । परंडा

परांडा येथील श्री भवानी शिक्षण प्रसारक मंडळ धाराशिव संचलित शिक्षण महर्षी गुरुवर्य रा गे शिंदे महाविद्यालय परांडा येथे बीएससी तृतीय वर्षात शिकत असणारी विद्यार्थिनी कै. वर्षा खरात हिचे दिनांक ५ एप्रिल रोजी महाविद्यालयाच्या एका कार्यक्रमात दुःखद निधन झाले होते. संस्थेकडून तिला भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. तसेच तिच्या पालकास श्री भवानी शिक्षण प्रसारक मंडळ धाराशिव व शिक्षण महर्षी गुरुवर्य रा गे शिंदे महाविद्यालय परंडा यांच्या वतीने एक लाख रुपयाचा धनादेश तिच्या गावी नाडी (जिल्हा सोलापूर) येथे जाऊन देण्यात आला. यावेळी संस्थेचे सचिव संजय निंबाळकर, अध्यक्ष सुनील शिंदे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जाधव यांच्या हस्ते हा धनादेश देण्यात आला. यावेळी संस्था सचिव संजय निंबाळकर यांनी वर्षा खरात हिच्या वडिलांना आश्वासन दिले की, त्यांच्या मुलाचे रा. गे. शिंदे महाविद्यालयातील पूर्ण शिक्षण मोफत दिले जाईल. भावनावश झालेल्या तिच्या आई–वडिलांचे संजय निंबाळकर सुनील शिंदे व प्राचार्य डॉ सुनील शिंदे यांनी यावेळी सांत्वन केले. यावेळी कनिष्ठ व वरीष्ठ विभागातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## ड्रग्ज प्रकरणातील संशयित आरोपींना तुळजाभवानी मंदिरात पूजा करण्यास मनाई

### जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांची माहिती

आरंभ मराठी । धाराशिव

तुळजापूर ड्रग्ज प्रकरणातील संशयित पुजारी जोपर्यंत निर्दोष सिद्ध होत नाहीत, तोपर्यंत त्यांना मंदिरात पूजा करण्यास मनाई करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. या कारवाईची अंमलबजावणी लवकरच करण्यात येईल. मंदिराचे पावित्र्य कायम राखण्यासाठी पुजारी मंडळीदेखील आमच्याशी सहमत असल्याची माहिती जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी पत्रकार परिषदेत दिली. नुकत्याच घेतलेल्या बैठकीत ड्रग्ज संबंधी पुजारी बांधवांशी चर्चा केली आहे. यावेळी सकारात्मक चर्चा झाल्याचे जिल्हाधिकारी पुजार यांनी सांगितले. ड्रग्ज प्रकरणात एकूण किती आरोपी आहेत यासंबधी जिल्हाधिकारी यांनी माहिती दिली नाही.



### दोषी ठरवून शिक्षा होत नाही तोपर्यंत कारवाई नको

ड्रग्ज प्रकरणात जोपर्यंत न्यायालय या प्रकरणातील संशयीत आरोपींना दोषी ठरवून शिक्षा सुनावत नाही, तोपर्यंत त्यांच्यावर मंदिर प्रशासनाने मंदिरबंदी तसेच इतर कुठलीही कारवाई करू नये अशी मागणी बैठकीत जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे. त्यामुळे याबाबत कोर्टाचा निर्णय आल्यानंतरच कारवाई करण्यात यावी अशी भूमिका पाळीकर पुजारी मंडळाची आहे.

**–विपिन शिंदे**
**अध्यक्ष, पाळीकर पुजारी मंडळ.**

### कोर्टात निर्णय झाल्यानंतरच कारवाई व्हावी

आतापर्यंत जी नावे या ड्रग्ज प्रकरणात समोर आली आहेत ते संशयित आरोपी आहेत. त्यामुळे भविष्यात कोर्टात जो निर्णय होईल त्यानंतरच त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी भोपे पुजारी मंडळाची भूमिका आहे.

**–अमरराजे कदम परमेश्वर**
**अध्यक्ष, भोपे पुजारी मंडळ.**

## रुपामाता उद्योग समूहाचे प्रमुख अ‍ॅड.व्यंकटराव गुंड आता समर्थ बँकेचे अध्यक्ष



आरंभ मराठी । धाराशिव

कृषी उद्योगात नावलौकिक मिळवलेल्या रूपामाता उद्योग समूहाचे सर्वेसर्वा अ‍ॅड.व्यंकटराव गुंड यांची समर्थ अर्बन को. ऑप बँकेच्या अध्यक्षपदी निवड झाली असून, या निवडीनंतर अ‍ॅड.गुंड यांचा संचालक मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. अ‍ॅड.व्यंकटराव गुंड यांनी अल्प काळात रुपामाता उद्योग समूहाचा नावलौकिक केला असून, बँकिंग क्षेत्रातील दैदिप्यमान वाटचालीनंतर दुग्ध उत्पादन आणि प्रक्रिया उद्योग, गुळ पावडर उत्पादनात यशस्वी झेप घेतली आहे. कृषी क्षेत्रात त्यांच्या उद्योग समूहाने अनेक चांगले निर्णय घेऊन शेतकऱ्यांना लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे.बँकिंग क्षेत्रातील तुमचे योगदान विचारात घेऊन समर्थ नागरी बँकेच्या अध्यक्षपदाची धुरा संचालक मंडळाने त्यांच्यावर सोपवली आहे. धाराशिव शहरातील अनेक वर्षे जुनी तसेच आरबीआयच्या नियमाप्रमाणे पारदर्शक व्यवहार करणारी बँक म्हणून समर्थ बँकेची ओळख आहे . या बँकेकडे सध्या ३० कोटींच्या ठेवी असून, १७ कोटींचे कर्ज वाटप आहे. अ‍ॅड. गुंड यांच्या माध्यमातून बँकेला अधिक बळ मिळेल,असा संचालक मंडळाला विश्वास आहे. दरम्यान, अ‍ॅड. गुंड यांची अध्यक्षपदी तर उपाध्यक्षपदी अ‍ॅड. निवृत्ती कुदळे यांची निवड करण्यात आली आहे. ही निवड सहकारी संस्थेचे सहाय्यक निबंधक अधिकारी धनाजी काळे, जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली.यावेळी बँकेचे माजी अध्यक्ष अ‍ॅड. मिलिंद पाटील, माजी उपाध्यक्ष अशोक उर्फ रवि त्र्यंबक पाटील (दुधगावकर), रामदास कोळगे,रूपामाता समूहाचे कार्यकारी संचालक अजित गुंड, कार्यकारी अधिकारी मिलिंद खांडेकर यांच्यासह संचालक, सभासद, ठेवीदार, अधिकारी, कर्मचारी यांच्या उपस्थितीत करण्यात आली. निवडीबद्दल अ‍ॅड .गुंड तसेच अ‍ॅड.कुदळे यांचे अभिनंदन होत आहे.

**पहलगाम हल्ल्यातील मृतांना श्रद्धांजली**

निवडीच्या या प्रक्रियेपूर्वी पहलगाममध्ये झालेल्या भ्याड दहशतवादी हल्यात मृत्यूमुखी पडलेल्या देशबांधवांना श्रद्धांजली वाहण्यात आली.तसेच या घटनेचा निषेध करून दहशतवाद्यांना तातडीने कंठस्नान घालावे,अशी मागणी करण्यात आली.

## सडा, रांगोळी आणि भगव्या पताकांनी सजली गोरोबा काकांची तेरनगरी

**विविध धार्मिक कार्यक्रमांनी वार्षिक समाधी सोहळ्याला सुरुवात**
**----------**
**तेरणाकाठी जमला वैष्णवांचा मेळा; एकादशीला पहाटे झाली महापूजा**



आरंभ मराठी । तेर

वैराग्य महामेरू संत गोरोबाकाका यांच्या ७०८ व्या वार्षिक समाधी सोहळ्यास बुधवारपासून (दि.२४) प्रारंभ झाला असून, नगर प्रदक्षिणा मार्गावर सडा रांगोळी आणि भगव्या पताक्यांनी सत्यपुरी नगरी दुमदुमून गेली आहे. संपूर्ण सत्यपुरी नगरीत ज्ञानोबा तुकारामांच्या जयघोषाने वातावरण भक्तीमय बनले असून, एकादशी दिवशी पहाटे काकाच्या समाधीची महापूजा जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्षा तथा लेडीज क्लबच्या अध्यक्षा अर्चनाताई राणाजगजितसिंह पाटील, संत गोरोबाकाका व शिवमंदिर समितीच्या प्रशासक रूपाली कोरे, दत्तात्रय मुळे यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी मंदिर समितीचे निरीक्षक अतुल नळणीकर, रचना कन्स्ट्रक्शन कंपनीचे सर्वे सर्वा दत्तात्रय मुळे, उपसरपंच श्रीमंत फंड, माजी सरपंच नवनाथ नाईकवाडी, पुजारी रघूनंदन महाराज, पुजारी विठ्ठल लामतुरे, बालाजी पांढरे, संजय कडाप्पा इंगळे, मंदिर समितीचे व्यवस्थापक साहेबराव सौदागर यांची प्रमुख उपस्थिती होती. सोहळ्यात सहभागी झालेल्या टाळकरी फडकरी यांनी नगरप्रदक्षिणा काढून या वेळी भक्तीमय वातावरण तयार केले. प्रत्येक फडावर दिवसभर प्रवचन, किर्तन, भारूड, भजन आदी कार्यक्रमाने भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. आलेल्या दिंडी पालखी सोहळ्यात बालवारकऱ्याची संख्या लक्षणीय आहे. बालवारकऱ्यांनी आपली कला सादर करून उपस्थित भाविकांची दाद मिळविली. दरम्यान भाविकांनी यात्रा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन सहाय्यक धर्मादाय आयुक्त तथा मंदीराच्या प्रशासक रूपाली कोरे यांनी केले आहे. गतवर्षीच्या तुलनेत यावर्षी व्यावसायिक दुकानाची संख्या जास्त आहे. येथील रचना कन्स्ट्रक्शन कंपनीचे दत्तात्रय मुळे यांच्या वतीने दर्शनासाठी येणाऱ्या प्रत्येक भाविकाला खिचडी व केळी वाटप करण्यात आले रणसम्राट ग्रुप यांच्या वतीनेही मंदिरात येणाऱ्या भाविकांना खिचडीचे वाटप करण्यात आले. तर विजय कुलकर्णी व परिवाराच्या वतीने बुकनवाडी रस्त्यावर भाविकांना खिचडीचे वाटप करण्यात आली. तसेच संजय कडाप्पा इंगळे यांच्या वतीने भाविकांना रसनाचे वाटप करण्यात आले. विविध संस्था, नागरीक यांच्या वतीने थंड पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली होती.
समाधी सोहळ्यानिमित्त समाधी मंदिरात फुलांची सजावट करण्यात आली होती. ग्रामपंचायतीच्या वतीने भाविकांसाठी स्वच्छ पाणी, फिरते शौचालय, तेरणा नदीच्या काठावर तात्पुरत्या स्नानासाठी व्यवस्था, दिंडी पालखी तळावर पाण्याच्या टँकरची सोय करण्यात आली असल्याचे उपसरपंच श्रीमंत फंड यांनी सांगितले.

**उद्या शनिवार (दि.२६) काकांच्या पुण्यतिथीनिमित्त मंदिरात दत्ता महाराज अंबीरकर यांचे किर्तन होणार आहे. तसेच रविवार (दि.२७) नरसिंह मंदिरात हजेरी कीर्तन होणार आहे. दुपारी जंगी कुस्त्यांचा फड रंगणार आहे.**

## उमरगा येथे गंभीर मारहाण करून एकाला लुटले

आरंभ मराठी । उमरगा

उमरगा तालुक्यातील जवळगाबेट येथे एका व्यक्तीला गंभीर मारहाण करून तिघांनी लुटल्याची घटना घडली. यातील बफिर्यादी आदीनाथ निवृत्ती गायकवाड (वय ५५ वर्षे, रा. जवळगाबेट ता. उमरगा) हे दिनांक २३ एप्रिल रोजी रात्री सव्वा बारा वाजता चौरस्ता व बायपास उमरगा शिवार एनएच ६५ रोडवर वाहनाची वाट पाहत होते. दरम्यान अज्ञात तीन इसमांनी अ‍ॅटो रिक्षामध्ये येवून त्यांना जबरदस्तीने अ‍ॅटोमध्ये बसवून उमरगा बायपास रोडवर कोरेगावाडीकडे जाणाऱ्या रस्त्यावर नेवून त्यांना लाथाबुक्यांनी, चाकु व लोखंडी रॉडने मारहाण करुन गंभीर जखमी केले. तसेच त्यांच्या जवळील बॅगमधील रोख रक्कम ५,५५० रुपये, दोन मोबाईल फोन व कागदपत्रे जबरीने लुटून पसार झाले.

CMYK

## सार्वभौमत्वावर हल्ला !

काश्मीरला विशेष दर्जा देणारे ३७० वे कलम हटवून केंद्र सरकारने काश्मीरचे त्रिभाजन केले. या घटनेला या ऑगस्ट मध्ये सहा वर्ष पूर्ण होतील. ३७० वे कलम हटवल्यानंतर काश्मीरमध्ये अनुचित प्रकार घडू नये यासाठी काश्मीरमध्ये कडेकोट सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती. कडेकोट सुरक्षा व्यवस्था असल्याने काश्मीरमध्ये बराच काळ शांतता होती त्यामुळे पर्यटनालाही चालना मिळाली होती. त्यामुळे नंदनवनात पुन्हा शांतता प्रस्थापित झाली असा समज निर्माण झाला होता मात्र या समजाला छेद देणारी घटना काश्मिरात घडली आहे. जम्मू काश्मीरमधील अनंतनाग जिल्ह्यातील पहलगाम येथे पाक पुरस्कृत दहशतवाद्यांनी पर्यटकांवर केलेल्या भ्याड हल्ल्यात २८ पर्यटक ठार झाले. या हल्ल्यात अनेक पर्यटक जखमी झाले. ठार झालेल्या पर्यटकात महाराष्ट्रातील सहा पर्यटकांचा समावेश आहे. या हल्ल्याने देशभर संतापाची लाट उसळली आहे . पहलगाम येथे झालेला हा हल्ला भारताच्या सार्वभौमत्वावर झालेला हल्ला आहे. या हल्ल्याने काश्मीरमध्ये दहशतवाद्यांनी पुन्हा डोके वर काढले असून काश्मीरमध्ये पुन्हा घातपाती कारवाया सुरू झाल्याचे स्पष्ट झाले आहे. या हल्ल्याने सहा वर्षापूर्वी काश्मीरमधीलच पुलवामा येथे झालेल्या हल्ल्याची आठवण झाली. सहा वर्षापूर्वी पाकिस्तानच्या जैश ए मोहंमद या दहशतवादी संघटनेने भारतीय जवानांवर केलेल्या हल्ल्यात ४० हून अधिक जवान शहीद झाले होते. पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यात दहशतवाद्यांनी पर्यटकांना त्यांचा धर्म विचारुन ठार केले. दहशतवाद्यांनी हिंदू पर्यटकांना जाणीवपूर्वक टार्गेट करून ठार केले. याचाच अर्थ हा टार्गेट कीलींगचा प्रकार आहे. काश्मीरमध्ये टार्गेट किलिंगचा हा पहिलाच प्रकार आहे असे नाही. मागील वर्षी जम्मू काश्मीरच्या दिवसी जिल्ह्यातील कंदा परिसरात वैष्णवदेवीच्या दर्शनासाठी जात असलेल्या भाविकांच्या बसवर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला केला होता त्यात १० भाविक मरण पावले तर ३३ हून अधिक भाविक जखमी झाले होते. पहलगाम येथे झालेला हल्ल्याला गेल्या काही दिवसात काश्मीरमध्ये झालेला सर्वात मोठा भीषण हल्ला म्हणता येईल अर्थात काश्मीर खोऱ्यात कडेकोट बंदोबस्त असूनही लहान मोठे हल्ले चालूच होते मात्र या हल्ल्याने काश्मीरमध्ये पुन्हा दहशतवादी मोठ्या प्रमाणात सक्रिय झाल्याचे स्पष्ट झाले आहे. या हल्ल्याने दहशतवाद्यांनी केंद्र सरकारला दाखवून दिले आहे की काश्मीरमध्ये दहशतवाद अजूनही कायम आहे. केंद्र सरकारने हा हल्ला गांभीर्याने घेतला असून या हल्ल्याची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. भारताचे पंतप्रधान, गृहमंत्री, संरक्षणमंत्र्यांनी हा हल्ला पाकिस्तान पुरस्कृतच असून या हल्ल्याला जशास तसे उत्तर दिले जाईल असा इशारा दिला आहे. पाकिस्तानने मात्र हे पाप आमचे नाही असे म्हटले आहे. पाकिस्तान काहीही म्हणो मात्र हा हल्ला पाकिस्तान पुरस्कृतच होता हे शाळकरी मुलेही सांगतील. सुंब जळाला तरी पिळ जात नाही ही म्हण पाकिस्तानसाठी तंतोतंत लागू पडते. पाकिस्तान आज अक्षरशः भिके कंगाल झाला आहे. पाकिस्तानी सरकार कटोरा घेऊन जगभर फिरत आहे मात्र त्यांना कोणीही भिक द्यायला तयार नाही. पाकिस्तानमधील जनता अक्षरशः देशोधडीला लागली आहे. स्थानिक फुटीरतावादी लोकांची साथ असल्याशिवाय इतका मोठा हल्ला करणे दहशतवाद्यांना शक्य नाही त्यामुळे दहशतवाद्यांशी दोन हात करताना आणि पाकिस्तानला जशास तसे उत्तर देतानाच केंद्र सरकारने ही फुटिरतावादी कीड देखील मुळापासून उखडून टाकायला हवी.

# आनंद म्हणजे काय असतो?

असं म्हणतात, ''चार पैसे कमी मिळाले तरी चालतील, चार वस्तू कमी मिळाल्या तरी चालतील, पण जगण्यातला आनंद कमी करू नका.'' असं म्हणणारी माणसं संख्येने जगात कमी असतात. परंतु अशी माणसं आणि त्यांचे विचार असणे ही गोष्ट समाजाच्या हिताचीच आहे. आज जग भले त्यांच्या म्हणण्यानुसार चालत नसेल, तरी त्यांच्या सहवासातून किंवा व्यवहारातून जगाला आपले दोष लक्षात यायला मदत होते.



आनंद म्हणजे गाडी, बंगला, जमीन जुमला आणि बँक बॅलन्स असं समजणाऱ्यांचं आज पारडं जड आहे. पण ''आनंद आणि सुख ही भौतिक गोष्टींपलीकडची अद्भुत अनुभूती आहे,'' असं मानणाऱ्यांची संख्या कमी आहे. खरंतर भौतिक सुखाच्या पलीकडे आनंद आहे, असं म्हणणाऱ्यांचं अंतःकरण शुद्ध असतं. कोणत्याही गोष्टीकडे शुद्ध हेतूने पाहणं म्हणजेच आनंदी राहणं, हाच त्यांच्या जगण्याचा खरा मूलमंत्र असतो.

कपाळावर आठ्या आणून एखाद्या व्यक्तीकडे पाहताना मनात द्वेष, राग किंवा कमी लेखण्याची भावना असते, तो आनंदाचा भाव नसतोच. एखाद्याने कार घेतली तर त्याच्या आनंदात आपणही सहभागी होऊन, हसतमुखाने त्याला शुभेच्छा दिल्या तरच तो खऱ्या अर्थाने शुद्ध अंतःकरणाने व्यक्त केलेला आनंद असतो. परंतु जळफळून अभिनंदन करणं हे खोटं आणि पोकळ असतं.

आजूबाजूला प्रत्येक व्यक्तीचा विकास होणार आहे, प्रत्येक घटक प्रगतीपथावर जाणार आहे. अशा काळात 'आनंद देऊ आणि घेऊ' ही वृत्ती जोपासली पाहिजे.

आज समाजामध्ये विवेकबुद्धीचा ऱ्हास होत आहे. लग्नाची वरात काढणारे आनंदाने नाचत असतात. पण त्यांना पाहणाऱ्या काही लोकांना ते खटकतं. अशा प्रसंगी आपण विवेकबुद्धी जागृत ठेवली पाहिजे. दुसऱ्याच्या आनंदावर आपण चिडणं म्हणजे आनंद उपभोगण्याचा हक्क स्वतःलाच आहे, असा समज करून घेणं होय. माणूस समाजशील आहेच, पण तो उत्सवप्रियही आहे. मात्र, उत्सवांतील अतिरेक टाळायला हवा. इतरांच्या आनंदालाही मान्यता दिली पाहिजे. याने समाजातील आनंदाचं संतुलन राखलं जातं.

आनंद नेमका कशातून मिळतो? हे अनेकांनी अनुभवले असेल. स्वतः कष्ट करून धन, यश आणि कीर्ती मिळवण्यात खरा आनंद असतो! आयतखाऊपणात आनंद नसतो. परावलंबी, पराधीन जीवन म्हणजे दुःख. म्हणून, शक्य तेवढं स्वावलंबी बनावं. स्वतःचे कपडे स्वतः धुणे, स्वयंपाक करणं, स्वकष्टाने जगणं यासारखं दुसरी आनंदी गोष्टच नाही.

स्वार्थी वृत्ती दुःखाकडे नेत असते. ''सर्व काही मलाच मिळालं पाहिजे!'' ही वृत्ती आनंद नष्ट करते. एकावर एक मजले बांधूनही काहींना आनंद मिळत नाही, पण झोपडीत राहणारा व्यक्ती मात्र आपल्या कुटुंबाच्या हसऱ्या चेहऱ्यांत खरा आनंद अनुभवतो. दुसऱ्याला मदत करण्यात, सेवा करण्यातही विशेष आनंद असतो. सार्वजनिक स्वच्छता मोहिमेत सामील होऊन स्वच्छता केल्यानंतर मिळणारा आनंद बाजारातून विकत घेता येत नाही. रक्तदान करताना अनुभवला जाणारा समाधानाचा क्षण शब्दात मावणारा नसतो. आपली नोकरी, व्यवसाय प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि मनापासून केल्यावर जो आत्मसंतोष मिळतो, तोच खरा आनंद असतो. अन्नछत्रात स्वयंपाक करणं, लोकांना वाढणं , ऊष्टी काढणं हे सर्व कार्य निरपेक्ष भावाने केलेलं असतं आणि त्यातून मिळणारा आनंद वेगळाच असतो.



**किशोर जाधव**
मो. ९९२२८८२५४१
सोलापूर

एखाद्याला भक्तिभावाने दैवताची आराधना करण्यात आनंद मिळतो, तर दुसऱ्याला आदर्श विचारांचं पालन करण्यात. शुद्ध, सात्विक आहार घेताना मिळणारा आनंद मसालेदार आहारापेक्षा कित्येक पटीने श्रेष्ठ असतो. कलेचा आस्वाद घेण्यात, छंद जोपासण्यात आणि नवनिर्मितीतही आनंद असतो. कवी, चित्रकार, मूर्तिकार यांना त्यांच्या सृजनातून मिळणारा आनंद गगनात मावणारा नसतो. रानात फिरताना एखाद्या फुलपाखराच्या मागे धावताना मिळणारा आनंदही शाश्वत असतो. आनंद कुठे आहे हे ज्याला उमगतं, तो चिंता, तणाव आणि दुःखांपासून मुक्त होतो. तो संकटांना धैर्याने सामोरा जातो. खऱ्या आनंदाने जगणारा व्यक्ती उत्साही आणि ऊर्जावान दिसतो. याउलट, सर्व काही असूनही सतत चिडचिड करणारा, अस्वस्थ असलेला माणूस आनंदी नसतो.

उच्च पद हे आनंदाचं मोजमाप नसून, त्या पदावर राहून इतरांचं जीवनमान उंचावण्यात खरा आनंद असतो. आनंदी माणूस भरकटत नाही, वाममार्गाला लागत नाही आणि त्याचं जीवन इतरांसाठी प्रेरणादायी ठरतं.

म्हणूनच, जीवनात खऱ्या आनंदाच्या वाटेवर चालण्याचा आणि इतरांनाही त्या वाटेवर सोबत घेऊन जाण्याचा प्रयत्न आपण नेहमी केला पाहिजे. कारण, खरा आनंद मिळवणं हीच खरी संपत्ती आहे.

# वैशाख वणव्यात फुलतो मनमोहक गुलमोहर...

शिशीर ऋतूमध्ये झाडांची पाने गळतात.जवळ जवळ सगळे वृक्ष पर्णविहीन होतात.वसंत ऋतूचे आगमन झाल्यावर चैत्र महिन्यात काही झाडांना नवी पालवी फुटते. ही नाजूक लुसलुशीत पालवी हळूहळू मोठी होत जाते.तिचे हिरव्यागार पानांत रुपांतर होते आणि पर्णविहीन झालेली झाडे हिरव्यागार पानांनी बहरून येतात. एकीकडे उन्हाळ्याची चाहूल लागलेली असते आणि दुसरीकडे कडुनिंबाची झाडे हिरवा शालू नेसल्यासारखे हिरवीगार होऊन जातात.तिकडे फाल्गुन महिन्यात पर्णविहीन झालेला पळस लालबुंद फुलांनी सजलेला असतो.पुर्वी होळी आणि रंगपंचमी सणाला पळस फुलांचा नैसर्गिक रंग खेळला जायचा पण कृत्रिम रंगांच्या नादात ही गोष्ट आता भूतकाळात जमा झाली आहे.चैत्र महिन्याच्या शेवटी शेतकरी शेतातील रब्बी पिकांची रास करून धान्ये घरांत आणतात आणि सगळे शेत ओडके बोडके होते.एरवी दाव्याला बांधून ठेवलेली जनावरे रानोमाळ हिंडून पालापाचोळा खातात.दुपारच्यावेळी शिवारात उपलब्ध असलेले थंडगार पाणी पिऊन तृप्त होतात आणि दुपारच्या रणरणत्या उन्हात हिरव्या झाडांच्या सावलीत जाऊन बसतात.



जिकडे तिकडे उन्हाळ्याचे रणरणते उन असते आणि तप्त सूर्यकिरणे पृथ्वीला भाजून काढतात.सगळीकडे वैशाख वणवा पसरतो आणि जीवसृष्टीच्या अंगाची लाही लाही होते.असाह्य उकाडा जीव कासावीस करून टाकतो.उन्हाच्या झळा आगीचे स्त्रोत सर्वत्र पसरवतात आणि वैशाख वणव्यातला उकाडा जगणे मुश्कील करतो.रानावनात आगडोंब उसळतो आणि जीवसृष्टी नष्ट होते की काय अशी भीती वाटते.अशा ह्या भयंकर व रणरणत्या उन्हात आणि उघड्या बोडक्या उजाड माळरानावर नैसर्गिक किमया पाहायला मिळते. ध्यानीमनी नसणारी आल्हाददायक गोष्ट स्पष्टपणे जाणवते.नेहमी दूर्लक्षित राहणारा गुलमोहर फुलतो आणि सर्वांचे लक्ष वेधून घेतो. त्याची ती टवटवीत लालबुंद फुले एक प्रचंड असा आशावाद मनात रुजवतात.लाल फुलांनी बहरून आलेले आणि लाल फुलांनी सजलेले गुलमोहराची झाडे मानवी मनाला मोहून टाकतात,उदास मनाला प्रसन्न करतात.रणरणत्या उन्हाळ्यात मानवी मन उदास आणि दुःखी कष्टी झालेले असते,मनात नकारात्मक भावना उचमळत असते तेव्हा टवटवीत अशा लालबुंद फुलांचा मनमोहक गुलमोहर जीवन जगण्याचा मूलमंत्र देतो.जीवनात कितीही संकटे आली तरी डगमगायचे नसते,नवा आशावाद व नवी स्वप्ने उराशी बाळगून बहरून यावे लागते आणि नव्या उमेदीने जीवन जगण्याचा आदर्श घेतला पाहिजे.जणू हीच शिकवण तो मनमोहक गुलमोहर आपल्याला देत असतो. आणि ते खरे आहे. कारण जीवसृष्टी होरपळून टाकणाऱ्या रणरणत्या उन्हाळ्यात सगळे कासावीस झालेले असतात आणि हा एकटा गुलमोहर कसा ऐटीत डौलाने उभा असतो.आणि त्याच्याकडे पाहणाऱ्याच्या मनाला मोहून टाकतो,सुखद गारवा देतो.वैशाख वणव्यात रानावनातील पाण्याचे साठे आटलेले असतात, जमिनीतील पाण्याची पातळी खाली घसरलेली असते.तहान लागलेले सगळे जीव पाणी पिण्यासाठी धडपडत असतात. पाण्याविना कोमेजून जातात आणि हा बहरलेला गुलमोहर रुबाबात गाणे गात असतो...


**बबन दामोदर गुळवे**
उमरगा कोर्ट,ता.अहमदपूर
जि.लातूर.मो.९५४५४४२६४८

या जगण्यावर या जन्मावर शतदा प्रेम करावे...धन्य तो मनमोहक गुलमोहर आणि धन्य ती निसर्गाची किमया...वैशाख महिन्यात ज्यांचे विवाह गाव खेड्यात आणि बौद्ध पद्धतीने होतात त्या विवाहांमध्ये आजही अक्षता म्हणून मनमोहक गुलमोहरांच्या फुलांचा उपयोग केला जातो.रणरणत्या उन्हाळ्यात गुलमोहराच्या टवटवीत फुलांचा हा फार मोठा आधार मिळतो... काळ्याभोर आणि विस्तीर्ण अशा रखरखीत रान शिवारात फुललेला सुंदर,प्रफुल्लित आणि मनमोहक गुलमोहर मानवी मनाला मोहून टाकतो,एक विलक्षण असा आनंद देतो. निसर्गाने दिलेली ही एक अनमोल भेट मानवी जीवनाला एक वरदान आहे...

वैशाख वणव्यात
रणरणत्या उन्हात
गुलमोहर फुलतो
मन मोहून टाकतो
संकटे आली कितीही
मुळीच डगमगू नका
गुलमोहराला पाहून
बिनधास्त जीवन जगा...

# पाकिस्तानला जशास तसे उत्तर देण्याची गरज

भारत विकासाचे शिखर गाठत असतांना पाकिस्तान कडून वारंवार आतंकवादी हल्ले होत असतात.यावर भारतीय सेनेने आपली पकड मजबूत करून शेकडो आतंकवाद्यांचा सफाया केला.ह्या संपूर्ण बाबी पाकिस्तानला रूतायला लागल्या आणि दहशतवाद्यांच्या मार्फत पाकिस्तानने पहलगाममधे हल्ला करून निरपराध २८ लोकांचा बळी घेतला व अनेकांना गंभीरपणे जखमी केले. ही बाब भारत कधीच सहन करणार नाही आणि या घटनेची संपूर्ण जगाने निंदा सुध्दा केली आहे. पहलगामसह जम्मू काश्मीरमध्ये पर्यटकांचा वाढता ओघ पाहता पाकिस्तान आगबबुला झाला आहे.कारण २०२४ मध्ये २ करोड पर्यटकांनी पहलगामसह जम्मू काश्मीरमध्ये आपली हजेरी लावली. हे खेळीमेळीचे वातावरण पाकिस्तानला नेहमीच रूतत असते आणि यावर अंकुश लावण्यासाठी पाकिस्तान दहशतवाद्यां मार्फत भ्याड हल्ले करीत असतो. भारत सरकारने आतंकवाद्यांवर आपली पकड मजबूत केल्यानंतर अचानक पहलगाममधे दहशतवादी हल्ला होतो ही अत्यंत दुःखद व गंभीर बाब आहे.यावरून स्पष्ट होते की पहलगामधील दहशतवादी हल्ला हा सुनीयोजित असावा तेव्हाच त्यांनी सुरक्षा घेरा तोडुन २८ निरअपराधांचा बळी घेतला व अनेकांना गंभीररीत्या जखमी केले. या घटनेला कोणीच माफ करणार नाही.आज भारत आणि पाकिस्तान यांना स्वतंत्र होवून ७८ वर्षे झाली. या ७८ वर्षांत भारत एक पाऊल पुढे जात आहे आणि पाकिस्तान आतंकवादी कारवायांमध्ये जखडून रक्ताच्या थारोळ्यात गुरफटला असुन हजारो पाऊल मागे येत आहे. त्याचेच प्रायश्चित्त म्हणून आज पाकिस्तान भिकेला लागला असून आतंकवाद्यांचे माहेरघर बनला आहे. त्यामुळे पहलगामधील पर्यटकांवर दहशतवाद्यांनी केलेल्या हल्याचे प्रायश्चित्त पाकिस्तानला अवश्य भोगावे लागेल. कारण पुलवामा हल्ल्यानंतरचा हा सर्वात मोठा आतंकवादी हल्ला आहे आणि याची किंमत पाकिस्तानला मोजावी लागेल हेही तितकेच सत्य आहे.पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याची जबाबदारी ''लष्करे तय्यबा''ची उपसंघटना ''द रेझिस्टन्स फ्रंट''ने स्वीकारली आहे. त्यामुळे आता सिद्ध झाले की, पाकिस्तानमधील भाड्याच्या संघटनेने हे घृणास्पद कृत्य केले आहे. त्यामुळे आतंकवाद्यांचा सफाया तर होईलच सोबतच याचा खामियाजा पाकिस्तानला चांगलाच भोगावा लागेल. काही दिवसांपूर्वी पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर यांनी पुन्हा काश्मीरचा मुद्दा उपस्थित केला होता.काश्मिर हा पाकिस्तानचा अभिमान असून ते आम्ही कधीच विसरणार नाही,अशी गरळही त्यांनी ओकली होती. त्यामुळे पहलगामधील हल्ला पाकिस्तानी आतंकवाद्यांनी सुनियोजित पद्धतीने केल्याचे स्पष्ट दिसून येते.त्यामुळे आता पाकिस्तानला जशास तसे उत्तर देण्याची गरज आहे.जय हिंद!



लेखक
**रमेश कृष्णराव लांजेवार**
( स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# हृदयात जागा दे जरा, माडी कशाला पाहिजे, अन् उंबरा दारास नाही तर मनास पाहिजे

**आरंभ मराठीच्या सर्व रसिक वाचकांना नमस्कार. आज काव्यारंभचे बारावे पुष्प मी सर्वांना सुपरिचित असलेल्या धाराशिवच्या लाडक्या सूत्रसंचालिका प्रा. सौ. सुनीता गुंजाळ / कवडे यांच्या सुंदर गझल घेऊन गुंफणार आहे.**

प्रा. सुनीता गुंजाळ या धाराशिव येथील तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयात लायब्ररीयन म्हणून कार्यरत आहेत. त्यांचे शिक्षण B.SC., M. Lib., M.Phil., SET,NET झालेले आहे. सूत्रसंचलना बरोबरच लेखन, वाचन, कथाकथन, रांगोळी, चित्रकला, बागकाम, इत्यादी छंद त्यांनी उत्तमरीत्या जोपासले आहेत. त्यांचा खोपा हा कथासंग्रह व मधुरघन हा प्रातिनिधीक कथासंग्रह प्रसिद्ध आहे. तसेच अनेक वर्तमान पत्र, दिवाळी अंकातून त्यांचे साहित्य प्रकाशित होत असते. आत्तापर्यंत एक हजाराच्या वर कार्यक्रमांचे त्यांनी सूत्रसंचालन केलेले आहे, सातव्या मराठवाडा लेखिका संमेलनात व ९३ व्या अखिल भारतीय संमेलनात नियोजन समितीत त्यांचा प्रत्यक्ष सहभाग होता व परिसंवादाचे सूत्रसंचालन केले होते. ९५ व्या उदगीर येथील व ९६ व्या वर्धा येथील अखिल भारतीय संमेलनात त्यांची गझल कट्ट्यावर निमंत्रित गझलकारा म्हणून निवड झाली होती. शांता शेळके जन्मशताब्दीनिमित धाराशिव येथील राष्ट्रीय कवयित्री संमेलनात त्यांचा निमंत्रित कवयित्री म्हणून सहभाग होता. कथाकथनासाठी सुद्धा २०२४ मधील अहमदपूर येथील मराठवाडा लेखिका संमेलनात, मसापच्या ४४ व्या छत्रपती संभाजी नगर येथील संमेलनात त्या निमंत्रित होत्या, अक्षरवेल मंडळात, उदगीर येथील आंम्ही सिद्ध लेखिका संमेलनात त्यांनी कथाकथन सत्राचे अध्यक्षपद भुषविले आहे. मराठवाडा साहित्य परिषदेच्या शाखा धाराशिवच्या सदस्य, अक्षरवेल महिला साहित्य मंडळ, धाराशिवच्या प्रसिद्धी विभाग प्रमुख, गझलमंथन साहित्य संस्थेच्या आजीवन सदस्य, लेडिज क्लब उस्मानाबादच्या सांस्कृतिक विभाग प्रमुख, कॉलेज मॅक्झिन तेरणांकुरच्या प्रत्येक वर्षी सहसंपादक व मराठी विभाग प्रमुख ह्या जबाबदाऱ्या त्यांच्यावरआहेत. सूत्रसंचालनाबद्दल विशेष सांगायचं म्हटलं तर लेडीज क्लब आयोजित विक्रमी गर्दी असलेल्या हवा येऊ द्या या कार्यक्रमाचेही त्यांनी सूत्रसंचालन अगदी उत्तम केलेले आहे. तर अशा या हरहुन्नरी, अष्टपैलु व्यक्तिमत्व असलेल्या कवयित्री व गझलकारा सुनीता गुंजाळ, त्यांच्या गझलाही अशाच वेगवेगळ्या विषयांवर भाष्य करतात. आता ही उंबरा मनाला पाहिजे हीच गझल बघा ना, यातील प्रत्येक शेर विनोदी शैलीनं जीवनातील सत्य सांगतो पण हा शेवटचा शेर

पोटास चिमटा घेऊनी संसार मी केला इथे
आता म्हणे माझ्या सुनेला घर पुण्याला पाहिजे

आजच्या तमाम मध्यम वर्गीयांची शोकांतिका शब्दबद्ध करतो. तर स्वप्नात भेटू एकदा ही गझल प्रेमी जीवांची तगमग सांगून जाते गझलकारा ती वाचव या गझलेत स्त्रीभ्रुण हत्या विरोधात आवाज उठवतात आणि म्हणतात,

मायबापाला जपत नाही अशी दाखव
पोटची मुलगी नको मारूस, ती वाचव!

प्रत्येक मुलगी आपल्या मातापित्यांवर जीवापाड प्रेम करत असते, तिला जपलं पाहिजे हा संदेश या गझलेत आहे. तर दुसऱ्या एका गझलेत

टाळू म्हटल्याने टळले नाही, दोघांचे नाते
कोर्टाच्या कट्ट्यावरती डोळ्यांनी भेटत होते

या शेरात पतीपत्नीच्या अतूट प्रेमाची ग्वाही दिलेली आहे. तर मेल्यानंतर ताज बांधला कोण पाहते . या गझलेतील शेरात

पाझर फुटला प्रेमाला ती गेल्या नंतर
मेल्यानंतर ताज बांधला कोण पाहते

आपल्या जीवलगावरअसलेले प्रेम ती व्यक्ती जिवंत असतानाच व्यक्त केले पाहिजे हा मोलाचा संदेश दिला आहे, व्यक्ती गेल्या नंतर कितीही मोठे स्मारक बांधले तरी ते त्या व्यक्तीला थोडेच दिसणार आहे ? त्यापेक्षा जिवंत असतानाची छोटीशी भेट सुद्धा जीवनात आनंद आणू शकते, तर अशा या गझलकारा प्रा.सुनीता गुंजाळ! यांच्या सुंदर गझलांचा आपण आस्वाद घेऊया.



**डॉ. रेखा अनिल ढगे**

**काव्यारंभ**

### उंबरा मनाला पाहिजे !

हृदयात जागा दे जरा ,
माडी कशाला पाहिजे
अन उंबरा दारास नाही
तर मनाला पाहिजे

आहे मुलाचा बाप तो !
फुटला भ्रमाचा भोपळा
मुलगी मिळावी तेवढी
हुंडा कशाला पाहिजे

मैत्रीण सुद्धा चालते त्याची मला केव्हातरी
तपशील गप्पांचा मला
तेव्हा कळाला पाहिजे

करता कशाला भेद
रंगाचा जरी मी बोलले
गोरी जराशी बायको
माझ्या मुलाला पाहिजे

पोटास चिमटा घेउनी
संसार मी केला इथे
आता म्हणे माझ्या सुनेला
घर पुण्याला पाहिजे

-----------------

### स्वप्नात भेटू एकदा!

छळले जगाने या जरी
स्वप्नात भेटू एकदा
नाहीच जमले जर तुला
स्वर्गात भेटू एकदा

ऐश्वर्य आहे लाभले मित्रा जरी मोठे तुला
कृष्णा सुदामा सारखे हर्षात भेटू एकदा

परदेश सारा पालथा
घालून आले मी परत
मज्जा कुठे ती गावची गावात भेटू एकदा

बांधून आहे ठेवले साऱ्या क्षणांना लाखदा
येईल का ते बालपण वर्गात भेटू एकदा
जमणार नाही मग मला
सांभाळणे माझे मला
रंगेल चर्चा फक्त एकांतात भेटू एकदा

--------------

### ती वाचव !

माय बापाला जपत नाही अशी दाखव
पोटची मुलगी नको मारुस ती वाचव

बांधला आहेस मोठा बंगला आता
माय बापाला कधी तर एकदा बोलव

काळजाला काय होते मी कसे सांगू
आपली तू फक्त मुलगी सासरी पाठव

केवढा गुंता मनाचा वाढला आहे
दोष देण्याच्या अगोदर तेवढा सोडव

वाढलेली तू उधळपट्टी जरा थांबव
काढले होते कसे तेव्हा दिवस आठव

--------------

### विधाता

ढासळलेल्या वाड्याच्या
दगडांशी बोलत होते
भातुकलीच्या आठवणी
अलगद कुरवाळत होते

ते तत्परतेने गेले माघारी माझ्या देखत
वादळ वाऱ्याला हल्ली
मी तर गोंजारत होते

टाळू म्हटल्याने टळले नाही दोघांचे नाते
कोर्टाच्या कट्ट्यावरती
डोळ्यांनी भेटत होते

रंगवले मी केसांना अन थोडेसे ओठांना
मी साध्वी मेळ्यामधली
लोकांना वाटत होते

आई ठेवावी कोठे दोघेही भांडत होते
भाऊ भाऊ चंद्रावर घर मोठे बांधत होते

--------------

### गझल

मेल्यानंतर ''ताज''
बांधला कोण पाहते !!
मला वाटले तिथे मुलींची शाळा भरते
इतकी गर्दी त्याच्या हृदयामध्ये असते

अशी काय ती जादू त्याच्या शेरा मध्ये
मैफिल सारी तिच्याकडे मग क्षणात वळते

लपून बसली हृदयामध्ये तुझी आठवण
कसे म्हणू मग वर जाताना सोबत नसते

लावत असते हल्ली कुंका सोबत बुक्का
संसाराच्या चिंतेला मी नाही म्हणते

पाझर फुटला प्रेमाला ती गेल्यानंतर
मेल्यानंतर ''ताज'' बांधला कोण पाहते





सुनीता गुंजाळ-कवडे

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.-2023/90078

# तेरणा अभियांत्रिकीच्या मेकॅनिकल विभागातील विद्यार्थ्यांनी आत्मसात केले सौरऊर्जा व पवन ऊर्जा निर्मितीचे गमक

आरंभ मराठी । धाराशिव

**धाराशिव येथील तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागाच्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर साखर कारखाना केशेगाव, सौर ऊर्जा प्रकल्प केशेगाव व Sorigin व Serintica पवन ऊर्जा निर्मिती प्रकल्प धाराशिव, येथे नुकतीच भेट दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने, अकॅडमिक डीन आणि मेकॅनिकल इंजीनियरिंग विभागाचे विभाग प्रमुख डॉ.डी डी दाते यांच्या मार्गदर्शनाखाली ही सहल आयोजित करण्यात आली होती. या शैक्षणिक सहलीमध्ये विद्यार्थी व प्राध्यापकांचा विशेष सहभाग होता.**





डॉ. बाबासाहेब आंबेडकर साखर कारखाना केशेगाव येथे विद्यार्थ्यांनी पारंपारिक ऊर्जा प्रकल्प, साखर निर्मिती प्रकल्प, को जनरेशन प्रकल्प, डिस्टलरी प्रकल्प, बायोगॅस प्रकल्पाची माहिती घेतली. भेटी दरम्यान विविध मशिनरी आणि प्रोसेस संदर्भात, कारखान्याचे इंजि. ढवण यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्याच दरम्यान केशेगाव येथीलच सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पास भेट देऊन अपारंपारिक ऊर्जा निर्मिती प्रकल्पाची माहिती घेतली. यावेळी कारखान्याचे साईट इंजि. जगदाळे यांनी सौर उर्जा निर्मिती प्रकल्पाची माहिती दिली. शैक्षणिक सहली दरम्यान धाराशिव येथील सोरिन व सिरँटीका पवन ऊर्जा प्रकल्पास सर्व चमुने भेट देऊन पवन ऊर्जा निर्मिती संदर्भात माहिती घेतली. या संदर्भात कंपनीच्या वतीने देशपांडे , कृष्णा जाधव व आशुतोष सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माने आणि मेकॅनिकल विभागाचे विभाग प्रमुख डॉ. डी. डी. दाते यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालय धाराशिव येथे लवकरच पवन ऊर्जा व सोलार ऊर्जा या क्षेत्रामध्ये विद्यार्थ्यांकडून प्रोजेक्ट करून घेऊन प्रोजेक्टचे रूपांतर स्टार्ट अप मध्ये करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले जाणार आहे. त्यामुळे भविष्यामध्ये विद्यार्थ्यांना पवन ऊर्जा व सोलर ऊर्जा निर्मिती करणाऱ्या कंपन्यांमध्ये नोकरीची संधी मिळणार आहे. त्या दृष्टीने कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही व्ही. माने, डीन अकॅडमिक्स व मेकॅनिकल विभाग प्रमुख डॉ. डी. डी. दाते, ट्रेनिंग अँडप्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा.जगताप हे कार्य करत असून विद्यार्थ्यांना अपारंपारिक ऊर्जा प्रकल्पामध्ये नोकरीची संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करत आहेत. विद्यार्थ्यांच्या या शैक्षणिक सहलीचे नियोजन प्रा एस पी बिराजदार आणि प्रा एस डी शिंदे यांनी केले.

## विविध वृत्त...

### श्री तुळजाभवानी सैनिक स्कूलचा व्यंकट गौडा राज्यात द्वितीय



आरंभ मराठी । तुळजापूर

दिनांक १२ एप्रिल व १३ एप्रिल रोजी परभणी येथे झालेल्या राज्यस्तरीय शालेय म्युझिकल चेअर स्केटिंग स्पर्धेत १९ वर्ष वयोगटातील ३८ ते ४१ वजन गटामध्ये श्री तुळजाभवानी सैनिकी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात इयत्ता आठवी मध्ये शिकत असलेला व्यंकट देविदास गौडा हा विद्यार्थी राज्यात द्वितीय आला आहे. या यशासाठी त्याला राज्यस्तरीय प्रमाणपत्र आणि मेडल प्राप्त झाले. या यशाबद्दल विद्यालयाचे कमांडंट कर्नल मकरंद देशमुख प्राचार्य वैजीनाथ घोडके यांच्या हस्ते त्याचा सत्कार करण्यात आला. या विद्यार्थ्याला विद्यालयातील क्रीडा शिक्षक बिलकुले व सर्व क्रीडा शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. याप्रसंगी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### कळंबमध्ये कृत्रिम पाणीटंचाई, प्रशासनाला निवेदन



आरंभ मराठी । कळंब

शहरातील बाबानगर भागातील नागरिकांनी नगरपालिका प्रशासनाला निवेदन सादर करून कृत्रिम पाणीटंचाई व अस्वच्छ पाणीपुरवठ्याविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून या भागातील लक्ष्मण हुलजुते यांच्या घरापासून ते समीर सय्यद यांच्या घरापर्यंत या गल्लीत स्वच्छ पाण्याचा अपुरा व अनियमित पुरवठा केला जात असून काही भागांमध्ये पाणीच येत नाही, असा आरोप करण्यात आला आहे.

या निवेदनात १७ ते १८ कुटुंबांना दररोज पाणीटंचाईचा सामना करावा लागत असून, ही समस्या तात्काळ सोडवावी, अशी मागणी करण्यात आली आहे. याआधी २ एप्रिल रोजीही याच भागातील नागरिकांनी प्रशासनाकडे निवेदनाद्वारे लक्ष वेधले होते, मात्र अद्याप कोणतीही उपाययोजना करण्यात आलेली नाही, अशीही तक्रार नागरिकांनी केली आहे. निवेदनावर सुधाकर वेदपाठक, शेख वाजेद, इलाही बागवान, वेदपाठक औदुंबर, ईनुस मोमीन, विनोद लांडगे, सय्यद असद, अशोक भिसे यांच्यासह अनेक स्थानिक नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत. नागरिकांनी या पाणीटंचाईची कारणमीमांसा करून आवश्यक त्या उपाययोजना तत्काळ कराव्यात, अशी मागणी केली आहे.

### रिजवान करजगी यांच्यातर्फे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप



आरंभ मराठी । सोलापूर

लहान मुले ही देवघरची फुले,असे मानले जाते. जेव्हा त्यांना एखादी वस्तू किंवा साहित्य अथवा खाऊ अचानकपणे प्राप्त झाल्यास त्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळं स्मितहास्य निर्माण होते. त्यावेळी कोवळ्या, निरागस मुलांना भेटवस्तू देणाऱ्या व्यक्तींनाही मनोमन आत्मीय समाधान मिळते. सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी आणि नवीन वर्षात पदार्पण करताना आपला आनंद लहान मुलांना सोबत घेऊन द्विगुणित करावा याच मुख्य हेतूने प्रेरित होऊन सोलापूरतील आयडियल उर्दू माध्यमिक शाळेतील इयत्ता ७ वीचे वर्गशिक्षक रिजवान करजगी यांनी आपल्या वर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य आणि खाऊचे वाटप केले. जवळपास ४५ पटसंख्या असलेल्या या वर्गातील सर्वसामान्य कष्टकऱ्यांची मुले शिक्षण घेत आहेत. याप्रसंगी संस्थेच्या उपाध्यक्ष तबस्सुम शेख, मुख्याध्यापक इरफान जनवाडकर, वर्गशिक्षक रिजवान करजगी आदी शिक्षक उपस्थित होते.

### बुकनवाडीच्या मधू नागलबोनेची महसूल सहाय्यक पदाला गवसणी

आरंभ मराठी । तेर



धाराशिव तालुक्यातील बुकनवाडी या लहान गावातील कु.मधू महादेव नागलबोने हिची महसूल सहाय्यक पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मधू हिने शिक्षण घेत महसूल सहाय्यक पदाला गवसणी घातली तिच्या यशाबद्दल तिचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

# रचना कन्स्ट्रक्शन कंपनीच्यावतीने सलग २६ व्या वर्षी भाविकांना महाप्रसाद



आरंभ मराठी । तेर

धाराशिव तालुक्यातील तेर येथील रचना कन्स्ट्रक्शन कंपनीच्या वतीने संत गोरोबाकाका यांच्या समाधी सोहळ्यात काकांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी आलेल्या प्रत्येक भाविकांना महाप्रसाद वाटप करण्यात आला.

जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्षा अर्चनाताई राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते भाविकांना राजगिरा लाडू,केळी, पाणी बाटली वाटप करण्यात आले. रचना कन्स्ट्रक्शन कंपनीच्या वतीने सलग २६ व्या वर्षीही परंपरा कायम ठेवण्यात आली आहे.

यावेळी दत्तात्रय मुळे,सौ. उषाताई मुळे,सुरजीत मुळे,मंदिराचे पुजारी रघुनंदन महाराज पुजारी, महेश मुळे यांची उपस्थिती होती.

# सांडपाणी, नाल्यासह रस्त्याच्या समस्येबाबत झोरे गल्लीतील नागरिकांच्या वतीने निवेदन

आरंभ मराठी । धाराशिव



कचऱ्यासह तुंबलेल्या नाल्या, रस्त्याच्या समस्येबाबत शहरातील झोरे गल्ली येथील नागरकिंच्या वतीने नगर परिषदेला निवेदन देण्यात आले.

अनेक वर्षापासून झोरे गल्ली येथील नाली व रस्त्याचे काम करण्यात आलेले नाही. त्यामुळे नालीचे सांडपाणी रस्त्यावर येत असून,डुकरांचा वावर वाढला आहे. सांडपाण्यामुळे रोगराई निर्माण होत आहे. समस्या दूर करण्यात आल्या नाही तर आंदोलन करण्यात येईल,असा इशारा नगर पालिका प्रशासनाने दिला आहे. निवेदनावर सोनाली उपासे, शिवानंद बोटे, महेश उपासे, संगिता तोडकरी, लता तोडकरी, बेबी आगळे, मुक्ता सावंत, श्रीगोंदा तट, पूजा जवेरी, रेखा जवेरी, बानु शेख, शीला माने, निला पार्शी, शारदा जवेरी, मुमताज तांबोळी, श्याम पवार ,संगीता यमपुरे, शुभांगी भोकरे, दत्ता भोकरे, ज्योतीबा भोकरे, तनुजा कदेदे, स्वाती कांबळे इत्यादींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### जागतिक हिवताप दिनानिमित्त २५ एप्रिल रोजी मोहिमेचे आयोजन

आरंभ मराठी । जालना

जागतिक हिवताप दिन म्हणुन २५ एप्रिल हा दिवस साजरा करण्यात येतो. चला हिवतापाला संपवु या,पुन्हा योगदान द्या,पुन्हा विचार करा,पुन्हा सक्रिय व्हा' हे या वर्षीचे घोषवाक्य आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार,भारतामध्ये सन २०२७ पर्यत हिवताप दुरीकरण करण्याचे ठरविले आहे. संपुर्ण जिल्ह्यामध्ये दि.२५ एप्रिल २०२५ रोजी राबविण्यात येणाऱ्या मोहिमेसाठी आरोग्य यंत्रणेला सहकार्य करावे. तसेच हिवताप, डेंग्यु, चिकुणगुन्या व किटकजन्य आजारापासुन संरक्षण मिळविण्यासाठी या मोहिम काळातच नाही तर नेहमीसाठी आपल्या सभोवतालचा परिसर स्वच्छ ठेवावा.हिवतापाची लक्षणे आढळुन आल्यास जवळच्या आरोग्य संस्थेत संबंधीत वैद्यकिय अधिकारी यांच्या मार्फत तपासणी करुन योग्य औषध उपचार घ्यावा, असे जिल्हा हिवताप अधिकारी जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# रा गे शिंदे यांना पुण्यतिथी निमित्त अभिवादन



आरंभ मराठी । परंडा

श्री भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष कै. रा गे शिंदे गुरुजी यांना बुधवारी (दि.२३) रा गे शिंदे महाविद्यालयात पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले. तसेच यावेळी जम्मू आणि काश्मीर मधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २७ जणांचा मृत्यू झाला त्यांना महाविद्यालयाच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली.

यावेळी संस्थेचे सचिव संजय निंबाळकर, अध्यक्ष सुनील शिंदे, प्राचार्य डॉ सुनील जाधव यांच्या उपस्थितीमध्ये शिंदे गुरुजी यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून त्यांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी बीएसएनएल कार्यालयातील डेप्युटी जनरल मॅनेजर बाळासाहेब कोकिळे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच यावेळी जम्मू आणि काश्मीर मधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २७ जणांचा मृत्यू झाला, त्यांना महाविद्यालयाच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली. तसेच याच महाविद्यालयाचे शिक्षकेतर कर्मचारी सतीश दळवी यांचेही दुःखद निधन झाले त्यांनाही भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली . या वेळी उपप्राचार्य डॉ महेशकुमार माने, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ शहाजी चंदनशिवे, कनिष्ठ विभागाचे पर्यवेक्षक प्रा किरण देशमुख, प्रशासकीय अधिकारी भाऊसाहेब दिवाने व कनिष्ठ वरिष्ठ विभागातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ज्येष्ठ महिलेची फसवणूक करणाऱ्या आरोपी महिलेला एक तासात घेतले ताब्यात

**धाराशिव ग्रामीण पोलिसांची कामगिरी**

आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव तालुक्यातील उपळा येथील एका ज्येष्ठ महिलेची फसवणूक करून सात हजार रुपये लुटणाऱ्या आरोपी महिलेला धाराशिव ग्रामीण पोलिसांनी अगदी तासाभरात मुद्देमालासह ताब्यात घेतले. यासंबधी सविस्तर वृत्त असे की,

फिर्यादी कुसुम संदीपान खामकर (वय ७९ वर्षे, रा.उपळा ता. जि. धाराशिव) यांना दिनांक २३ एप्रिल रोजी दुपारी दीड वाजता एक अनोळखी महिला त्यांच्या उपळा येथील घरी भेटली होती. त्या अनोळखी महिलेने कुसुम खामकर यांना मी तुमची भाची आहे असे सांगुन त्यांच्या नवऱ्याला शासनाकडुन दीड लाख रुपये भेटतात असे सांगितले. त्यासाठी फिस म्हणून लाखाला पाच हजार रुपये असे एकुण सात हजार रुपये द्यावे लागतात असे त्या अनोळखी महिलेने सांगितले आणि कुसुम खामकर यांचा विश्वास संपादन केला. त्या महिलेने कुसुम खामकर यांच्या कडून सात हजार रुपये व त्यांच्या पतीचे आधार कार्ड घेऊन त्यांची फसवणुक केली. याप्रकरणी कुसुम खामकर यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव ग्रामीण पो ठाणे येथेभा.न्या.सं.कलम ३१९(२),३१८(४),३१६(२) अन्वये गुन्हा नोंदवला. गुन्हा दाखल करताच धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शेळके यांनी तात्काळ आरोपी महिलेचा शोध घेण्यास सांगितले. उपळा गावात व आसपास महिलेचा शोध घेतला असता, ती पोलिसांना मिळून आली. महिलेला नाव विचारले असता, तिने तिचे नाव शुभांगी शिवराज स्वामी (वय–४९) रा. हत्ते नगर, लातूर असे सांगितले. महिला कर्मचाऱ्यांनी तिची अंगझडती घेतली असता, तिच्याकडे रोख सात हजार रुपये आणि फिर्यादी कुसुम खामकर यांच्या नवऱ्याचे आधार कार्ड मिळाले. अवघ्या तासाभरात आरोपी महिलेला ताब्यात घेण्यात पोलिसांना यश आले. ही कामगिरी पोलिस अधीक्षक संजय जाधव, अपर पोलिस अधीक्षक श्रीमती शफकत आमना, उपविभागीय पोलीस अधिकारी स्वप्नील राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक शेळके, पो उपनिरीक्षक रोकडे, महिला पोलिस अंमलदार गिरी, पो स्टे आनंदनगर येथील महिला पोलिस शीतल पवार यांच्या पथकाने केली.

# उमरगा व लोहारा तालुक्यातील प्रलंबित अतिवृष्टी अनुदानाच्या मागणीसाठी मंगळवारी धरणे आंदोलन

**सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांची माहिती**

आरंभ मराठी । धाराशिव

उमरगा आणि लोहारा तालुक्यातील शेतकऱ्यांना अतिवृष्टीचे प्रलंबित अनुदान अजूनही मंजूर करण्यात आलेले नाही, या अनुदानाच्या मागणीसाठी येत्या २९ एप्रिल रोजी लोहारा तहसील कार्यालयासमोर तीव्र धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांनी दिली.

मागील खरीप हंगामात लोहारा व उमरगा तालुक्यात प्रचंड प्रमाणात पाऊस झाला होता. त्यामुळे पिकाचे मोठे नुकसान झाले होते. जिल्हा प्रशासनाने सुरुवातीला ८ ऑक्टोबर रोजी धाराशिव, कळंब, परंडा व वाशी या चार तालुक्यातील एक लाख ८० हजार ७८६ शेतकऱ्यांना २२१ कोटी ८१ लाख रुपये अतिवृष्टी मदत मिळण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवला होता तो मंजूर होऊन त्याचे बऱ्यापैकी वितरणही झाले आहे. लोहारा उमरगा तालुक्यात उशिराने पाऊस झाल्याने लोहारा उमरगा तालुक्यातील महसूल व कृषी विभागाकडून आलेल्या नुकसानीच्या प्रस्तावानंतर जिल्हा प्रशासनाने १५ ऑक्टोबर रोजी राज्य शासनाकडे अतिवृष्टी नुकसान भरपाई मिळण्यासाठी प्रस्ताव दाखल केला. लोहारा तालुक्यातील २४ हजार ७८० शेतकऱ्यांना ३३ कोटी ७० लाख तर उमरगा तालुक्यातील ४९ हजार २२८ शेतकऱ्यांना ५२ कोटी ७५ लाख मिळणे अपेक्षित आहे. लोहारा उमरगा तालुक्यातील ७९ हजार ८८६ शेतकऱ्यांना ८६ कोटी ४६ लाख रुपये मिळायला हवेत. १५ ऑक्टोबर रोजी जिल्हा प्रशासनाकडून विभागीय आयुक्त कार्यालयाला उमरगा लोहारा तालुक्यातील शेतकऱ्यांना अतिवृष्टी अनुदान मिळण्याचा प्रस्ताव पाठवला आहे. त्यानंतर विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर कार्यालयाकडून २७ ऑक्टोबरला महसूल व मदत पुनर्वसन खाते मंत्रालय येथे सदरील प्रस्ताव पाठविला असून, आत्तापर्यंत मंजुरी अभावी सदरील प्रस्ताव मंत्रालयामध्ये प्रस्ताव प्रलंबित आहे.

राज्य शासनाने २८ फेब्रुवारी रोजी राज्यातील अतिवृष्टी ग्रस्त काही जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मदत जाहीर केली मात्र त्यात लोहारा उमरगा तालुक्यातील अतिवृष्टी प्रस्तावाचा समावेश नाही जानेवारी मध्ये देखील ज्यांनी प्रस्ताव दाखल केले त्यांचे देखील प्रस्ताव मंजूर झालेले आहेत मात्र १५ ऑक्टोबर रोजी पाठवलेल्या जिल्हा प्रशासनाच्या प्रस्तावाला अद्याप पर्यंत मंत्रालयातून मंजुरी मिळालेली नाही. शासनाचे लक्ष वेधून घेऊन लोहारा ,उमरगा तालुक्यातील अतिवृष्टी शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा द्यावा यासाठी २९ एप्रिल रोजी सकाळी साडेदहा ते एक या दरम्यान लोहारा तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते आणि जगताप यांनी दिली आहे.

### आंदोलन तीव्र करणार



जिल्हा प्रशासनाने १५ ऑक्टोबर रोजी राज्य शासनाकडे प्रस्ताव दाखल केला मात्र त्याला अद्याप मंजुरी नाही. इतर जिल्ह्यातील जानेवारी महिन्यात पाठवलेल्या प्रस्तावाला मंजुरी मिळाली आहे. मात्र लोहारा उमरगा तालुक्याचा प्रस्ताव अगोदर जाऊनही त्याला मंजुरी मिळाली नाही. यासंदर्भात मंत्रालयात पाठपुरावा करूनही काही हालचाल होत नाही. त्यामुळे आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. मागणी मान्य न झाल्यास आंदोलन आणखी तीव्र करू मात्र लोहारा उमरगा तालुक्यातील शेतकऱ्यांना ८६ कोटी ४६ लाख रुपये अतिवृष्टीचे अनुदान मंजूर करून मिळवून दिल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही.

**–अनिल जगताप**
**सामाजिक कार्यकर्ता**

# जमीन भेगाळली, पाणी आटले; उन्हाळ्याने रौद्र रूप धारण केले

आरंभ मराठी SPECIAL

- ७०० फुटांखाली गेली जलपातळी, विहिरी-बोअरवेल कोरड्या
- पाण्याअभावी केळीच्या बागा करपू लागल्या
- डिहायड्रेशन, उष्माघाताचा आरोग्यावर थेट परिणाम

हर्षवर्धन मडके । आरंभ मराठी

**मोहा : उन्हाची तीव्रता प्रचंड वाढू लागली आहे. कळंब तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून तापमानात झपाट्याने वाढ होत आल्याचे दिसून येत आहे. एप्रिल महिन्याच्या शेवटी उन्हाचा पारा ४३ अंश सेल्सिअसच्या पुढे गेला आहे. या उष्णतेमुळे जमिनीतील पाणी अधिक वेगाने कमी होत असून, याचा थेट परिणाम भूजल पातळीवर होत आहे. तालुक्यातील बहुतांश गावांमध्ये विहिरी, बोअरवेल कोरड्या पडू लागल्या आहेत. नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा देखील तीव्र तुटवडा जाणवत आहे. त्यामुळे विहीर, कूपनलिका पुनर्भरणाच्या उपाययोजना तातडीने राबवा, अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे.**



दरवर्षी मर्यादित पावसामुळेच येथे पाणीटंचाई जाणवते. मात्र, यंदाच्या वर्षीचा उन्हाळा विशेषतः तापदायक ठरत असून, सध्याच्या वातावरणात दिवसागणिक तापमान वाढत आहे. पुढील काही दिवस तापमान ४५ अंशांपर्यंत जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. शेतकऱ्यांनी खोदलेल्या बोअरवेलमधूनही आता पाणी येणे मंदावले आहे. काही ठिकाणी पाण्यासाठी बोअर ३ ते ४ वेळा खोदण्यात आल्या, तरीही पाणी लागत नाही, अशी माहिती स्थानिक शेतकऱ्यांनी दिली. यामुळे मोठ्या प्रमाणात पाणी टंचाई जाणवू लागली आहे. पाणीटंचाईचा थेट परिणाम शेती आणि पाळीव जनावरांवर होत आहे. तापमान वाढल्यामुळे माणसाप्रमाणेच पशु, पक्षी आणि प्राणी देखील बैचेन झाले आहेत. पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली असून, काही गावात हंडाभर पाण्यासाठी पायपीट करावी लागत आहे. त्यातच वाढलेल्या उष्णतेमुळे उष्माघात आणि डीहायड्रेशन सारख्या समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे आरोग्याची काळजी घेणे गरजेचे बनले असून, वृद्ध आणि लहान बालकांची काळजी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

### पाणी पातळी घसरण्यामागची प्रमुख कारणे

१. **कमी पर्जन्यमान :** मागील दोन वर्षांत सरासरीपेक्षा ३०-४०% कमी पाऊस झाल्याने भूगर्भातील जलसाठे भरलेच नाहीत.
२. **अती बोरवेल्सचा वापर :** शेतकऱ्यांनी सिंचनासाठी अनेक बोरवेल्स घेतले, पण आता त्यातूनही पाणी येणं बंद झालंय.
३. **साठवणूक सुविधांचा अभाव :** गावात जलसंधारणाच्या मोठ्या प्रमाणावर उपाययोजना नाहीत.
४. **नैसर्गिक स्रोतांचे दुर्लक्ष :** पारंपरिक ओढे, तलाव, झऱ्यांची दुरवस्था झाल्याने ते निष्प्रभ झालेत.

### १४ हेक्टर वर केळी लागवड, मात्र भूजल पातळीतील घट ठरली डोकेदुखी

महात्मा गांधी रोजगार हमी योजनेअंतर्गत मोहा परिसरात १७ शेतकऱ्यांनी १४ हेक्टर वर केळीची लागवड केलेली आहे. मात्र, पाण्याअभावी पीक करपण्याच्या अवस्थेत आहेत. पारंपरिक पिकांना फाटा देत शेतकऱ्यांनी आधुनिक पीक पद्धतीचा अवलंब केला. मात्र दिवसेंदिवस पाणी पातळीत घट होत असल्याने शेतकऱ्यांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. जनावरांच्या पाण्यासाठी विशेष व्यवस्था करावी लागत असून, पाण्याच्या खासगी टँकरने पिण्यासाठी व जनावरांना पाणी घ्यावे लागत आहे. घरगुती वापरासाठी पाणीटंचाईवर उपाययोजना म्हणून टँकरने पाणीपुरवठा करण्याची मागणी वाढली आहे.

### उन्हाच्या झळांनी दुधाचे अर्थकारण ढासळले



प्रखर उन्हाच्या झळा इतक्या तीव्र आहेत की, त्याचा फटका केवळ माणसांनाच नव्हे, तर पशुधनालाही बसताना दिसतोय. या उन्हाच्या लाटेने दुग्ध व्यवसायावर मोठा परिणाम होत असून, दूध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांचे अर्थकारण ढासळलंय. सध्या हिरव्या चाऱ्याचा अभाव आणि वाढलेले तापमान यामुळे जनावरांना उष्णतेचा त्रास होतोय. उष्णतेमुळे त्यांचा श्वासोच्छवास वेगवान होतो. भूक मंदावते आणि पाणी पिण्याचे प्रमाण वाढते आणि शरीराचे तापमान प्रत्येक अंश सेल्सियसने वाढल्यास दुधात सुमारे एक ते दोन लिटरपर्यंत घट होऊ शकते. यामुळे दुधाची प्रतही घसरते. दुधातील फॅट, एसएनएफ (सॉलिड्स नॉन फॅट), साखर आणि प्रथिने यांची पातळी कमी होते आणि त्याचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर होत आहे.

### वाढत्या उष्णतेचा आरोग्यावर परिणाम, खबरदारी आवश्यक

''सध्या उन्हाचा पारा दिवसेंदिवस वाढत असून, त्यामुळे नागरिकांमध्ये डिहायड्रेशन, उष्माघात, चक्कर येणे आणि थकवा या समस्या वाढल्या आहेत. अशा तीव्र उष्णतेच्या काळात नागरिकांनी शक्यतो दुपारच्या वेळात बाहेर जाणं टाळावं, भरपूर पाणी प्यावं, हलका आणि सूती कपड्यांचा वापर करावा, तसेच वृद्ध, लहान मुले आणि गरोदर महिलांनी विशेष काळजी घ्यावी. गरज पडल्यास त्वरित प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा.''

**- डॉ. मनीष कस्पटे,**
**वैद्यकीय अधिकारी, प्रा.आ.केंद्र मोहा.**

## कळंब बस स्थानकातून महिलेचे सोने लुटले

आरंभ मराठी । कळंब

कळंब बस स्थानकातून गर्दीचा फायदा घेऊन महिलेचे एक लाख रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने लुटल्याची घटना घडली. यासंबधी सविस्तर वृत्त असे की, दिपा अजित परदेशी (वय ३९ वर्षे, रा. शिराढोण) या दिनांक २२ एप्रिल रोजी दुपारी दीड वाजता कळंब बसस्थानक येथे बसमध्ये चढत असताना अज्ञात व्यक्तीने गर्दीचा फायदा घेवून दिपा परदेशी यांच्या पर्समधील एक लाख पाच हजार रुपये किंमतीचे १७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने चोरुन नेले. याप्रकरणी दिपा परदेशी यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## पहलगाम सामुहिक हत्याकांडाच्या निषेधार्थ हिंदू समाजाच्या वतीने मोर्चा

### उपविभागीय अधिकारी वैशाली पाटील यांना निवेदन

आरंभ मराठी । भूम



जम्मू काश्मीर मधील पहलगाम भागात काश्मीरचे सौंदर्य पाहण्यासाठी गेलेल्या पर्यटकांवर काही अतिरेकी संघटनांनी अचानक हल्ला करून त्यांना धर्म विचारून गोळ्या घालून त्यांची हत्या करण्यात आली. हा हल्ला पहलगाममध्ये असणाऱ्या नागरिकांवर नाही तर संपूर्ण भारतातील हिंदू धर्मावर झाला असून,याचा निषेध करत भूममध्ये हिंदू बांधवांनी उपविभागीय अधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून प्रशासनाच्या माध्यमातून सरकारला निवेदन दिले.

निवेदनात म्हटले आहे की, हा सर्वात मोठा हल्ला आहे. काश्मीरचे सौंदर्य पाहण्यासाठी जाणाऱ्या सर्वच समाजातील नागरिकांवर त्यातल्या त्यात प्रमुख हिंदू समाजावर झालेला हा हल्ला आहे हल्लेखोर एवढे निष्ठुर होते की या हल्ल्यामध्ये अतिरेक्यांनी फक्त पुरुषांनाच एका लाईनमध्ये उभा करून त्यांच्या आई, बहीण, मुलगी, पत्नी यांच्यासमोर त्याच्या घरातील कर्त्या पुरूषाला गोळ्या घालून त्यांची निर्दयीपणे हत्या केली. निष्ठूर काळजाच्या धर्मांध अतिरेक्यांना लवकरात लवकर यमसदनी पाठवावे, या मागणीचे उपविभागीय अधिकारी वैशाली पाटील यांना निवेदन देण्यात आले. निवेदनामध्ये सदर हल्ल्यामध्ये नाहक निष्पाप हिंदू नागरिकांचे बळी गेले आहेत असे हल्ले भविष्यात होणार नाहीत या प्रमुख मागणीसाठी केंद्र सरकारने कठोर उपाय योजना करावी ही प्रमुख मागणी सकल हिंदू समाज बांधवांनी केली आहे. निवेदन देताना सर्वच पक्षाचे प्रमुख पदाधिकारी एकत्र आले होते.निवेदन देतेवेळी विलास शाळू,संतोष सुपेकर, हेमंत देशमुख, शंकर खामकर, किरण कुलकर्णी, भिकाजी पाटील, अंबादास देशपांडे, सोपान वरवडे, गोपाळ व्यवहारे, संभाजी गरड, अभिषेक करळे, शिवाजी चव्हाण, भागवत सानप, धनंजय महाडिक, हनुमंत सोनटक्के, सचिन बारगजे, उदय कुलकर्णी, बापू नाईकवाडी, रामराजे साळुंखे, सुनील डुंगरवाल, संजय शाळू, अतुल शेळके, अरुण देशमुख यांच्यासह अनेक हिंदू समाज बांधव उपस्थित होते.

### राज्यस्तरीय मंथन परिक्षेत हराळीच्या विद्यार्थिनीचे घवघवीत यश



आरंभ मराठी । लोहारा

नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय मंथन परिक्षेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हराळीतील स्वराली चंद्रकांत धानुरे हीचा केंद्रातून दुसरा क्रमांक आला तर इतर तिघे शर्यती बिभिषण ढोबळे, सोनिया अंकुश ढोबळे व सृष्टी सत्तेश्वर धानुरे हे उत्तीर्ण झाले . त्यामुळे मा. कै. डॉ. स्वर्णलता भिशीकर यांच्या स्मरणार्थ श्रीराम गोविंद धानुरे यांनी बक्षिस वाटप व ग्रामपंचायत हराळी तर्फे कार्यक्रम गुरुवारी (दि.२४) श्री हनुमान मंदिर हराळी येथे संपन्न झाला.

प्रमुख मार्गदर्शन जि.प. शाळा शिक्षिका सौ. शितल जाधव यांनी केले व कार्यक्रमाचा समारोप मा. माजी कॅप्टन व तंटामुक्त अध्यक्ष सुरेश सूर्यवंशी यांनी करत कार्यक्रमाची सांगता झाली. असे प्रोत्साहनपर कार्यक्रम का घ्यायचे व विद्यार्थ्यांचा सहभाग कसा वाढेल इत्यादी महत्वाच्या गोष्टीवर मार्गदर्शन झाले. कार्यक्रमास जि.प.प्राथ शाळा मुख्याध्यापक तात्याराव भालेराव ,उपसरपंच रविंद्र उर्फ किशोर सूर्यवंशी, अजित सूर्यवंशी, भैय्या धाडवे, पोलिस पाटील नितीन सोनवणे, अभिजित सूर्यवंशी, सुनिल रणखांब, ग्रामसेवक व कृषि अधिकारी व गावातील प्रतिष्ठित महिला ज्येष्ठ सदस्य ग्रामस्थ उपस्थित होते.

## जिल्हा युवा पुरस्काराची घोषणा

### दोन वर्षांच्या पुरस्काराचे १ मे रोजी होणार वितरण

आरंभ मराठी । धाराशिव



धाराशिव जिल्ह्यातील युवा व नोंदणीकृत संस्थांनी समाजहितासाठी केलेल्या कार्याचा गौरव करण्यासाठी क्रीडा विभागाच्या वतीने देण्यात येणाऱ्या जिल्हा युवा पुरस्कार २०२३ -२४ आणि २०२४ -२५ या दोन वर्षांच्या पुरस्काराची घोषणा करण्यात आली आहे. या पुरस्काराचे स्वरूप गौरवपत्र, सन्मानचिन्ह आणि रोख रक्कम (युवक/युवतीसाठी १० हजार रुपये, संस्थेसाठी ५० हजार रुपये) असे आहे.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा युवा पुरस्कार समितीचे अध्यक्ष किर्ती किरण पुजार यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी (दि.२४) झालेल्या बैठकीत पुरस्कारार्थींची निवड अंतिम करण्यात आली. बैठकीस विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

सन २०२३ -२४ चे पुरस्कारार्थी -
युवक : गणेश विक्रम मुळे, रा.मुळेवाडी, धाराशिव
युवती : डॉ.गौरी विजय बागल, तांबरी विभाग, धाराशिव
संस्था : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे बहुउद्देशीय सामाजिक संस्था, सारोळा (बु.), धाराशिव.

सन २०२४ -२५ चे पुरस्कारार्थी -
युवक : विकास शंकर लोभे,रा. कानेगाव, ता. लोहारा, धाराशिव
युवती : श्रीमती अस्मिता रमेश शिंदे मु.पो.शिंगोली, धाराशिव
संस्था : श्रीराम बहुउद्देशीय सामाजिक संस्था,गोजवाडा, ता.वाशी, धाराशिव.

या पुरस्कारांचे वितरण गुरुवार १ मे रोजी, महाराष्ट्र दिनानिमित्त, जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित कार्यक्रमात परिवहन मंत्री तथा पालकमंत्री प्रताप सरनाईक तसेच इतर मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी व सचिव, जिल्हा युवा पुरस्कार समिती श्रीकांत हरनाळे यांनी दिली आहे.

### तांबरी विभागात साडेचार लाखांची घरफोडी

आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव शहरातील तांबरी विभागातील एका घरातील साडेचार लाख रुपयांचे सामान चोरट्यानी लुटून नेल्याची घटना घडली. फिर्यादी अश्वीनी गोविंदराव सोमवारे (वय ३२ वर्षे) यांच्या तांबरी विभागातील रचना हाईट्स तिसरा मजला सि-६ येथील घराच्या दरवाजाची कडी कोंडा अज्ञात व्यक्तीने दिनांक २३ एप्रिलच्या रात्री तोडला. घरातील कपाटातील ड्रावरमध्ये ठेवलेले १३ तोळे २ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम २५,००० असा एकुण ४,४७,००० रुपये किंमतीचा माल चोरुन नेला. अश्वीनी सोमवारे यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३३१(३),३०५ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## पैलवान अमित जगदाळे यांनी ढगपिंपरी येथील मारले मैदान

### घुटना डावावर वीस सेकंदातच केले चितपट
### --------
### प्रेक्षकांना शंभर कुस्त्यांची पर्वणी

आरंभ मराठी । परंडा





परंडा तालुक्यातील ढगपिंपरी येथे ग्रामदैवत शंभु महादेव यात्रेनिमित्त आयोजीत कुस्ती स्पर्धेत इनाम रुपये ५५ हजाराच्या अंतीम कुस्तीत बुरुजबंद मल्ल अमित जगदाळे (रा.कंदर ता.माढा ) याने रविंद्र खैरे (कुर्डुवाडी) यास तुल्यबळ लढतीनंतर विसाव्या मिनिटाला घुटना डावावर चितपट करुन रोख इनामाचे बक्षिस पटकावले. तर क्रमांक दोनच्या कुस्तीत मल्ल समीर पठाण (परंडा ) याने संभाजी साळुंके (पुणे ) यास लपेट डावावर आस्मान दाखवुन रोख बक्षिस २२ हजार रुपये व चांदीची गदा पटकावली. या कुस्ती आखाड्यात लहान मोठ्या १०० कुस्त्या घेण्यात आल्या. कुस्ती आखाड्यात दुर गावाहुन आलेल्या मल्लांनी डाव-प्रतिडाव करीत, चितपटीच्या निकाली कुस्तीने मैदानात चांगलाच रंग भरला होता. प्रेक्षकांनी चटकदार चितपटीने कुस्ती केलेल्या विजयी मल्लांना बक्षिसे देऊन प्रोत्साहीत केले. हलगीच्या कडकडाटाने मैदानात मोठी रंगत आली होती. मल्ल दत्ता जानकर, प्रताप पाडुळे, पृथ्वीराज केमदारणे, रोहन दळवी, दादा नाईकवाडे, सौरव बागाव, सार्थक माने, विजय शिरसट, रणवीर शिंदे, रोहन माळी, दिपक पाटील, समद पठाण, विजय वाघे, संग्राम घोगरे, शंभु जाधव या मल्लांनी प्रतिस्पर्धी मल्लावर प्रेक्षणीय विजय मिळविले. यावेळी पंच म्हणुन सतीष मिस्किन, शिवाजी काळे, महादेव हिवरे, अशोक कात्रे, संभाजी काळे, भारत नागणे, दिनेश हिवरे यांनी काम पाहिले. यात्रेसाठी व कुस्ती आखाड्यासाठी संभाजी खर्चे, उपसरपंच अशोक गरड, बाबुराव तागभाते, वैजीनाथ हिवरे, रमेश गरड, शेखलाल शेख, समाधान नागणे, उत्तम कुंभार, डा.नवनाथ वाघमोडे, लहु मासाळ, शहाजी सोलनकर आदिसह ग्रामस्थांनी पुढाकार घेतला. कुस्ती आखाड्याचे खुमासदार समालोचन मोहसीन आत्तार (बार्शी) यांनी केले.

## विवाह प्रसंगी पाहुण्यांना भारतीय संविधानाचे पुस्तक भेट



### तुपसौन्द्रे कुटुंबाचा स्तुत्य उपक्रम

आरंभ मराठी । कळंब

विवाहास आलेल्या पाहुण्यांना आणि आप्तेष्टांना भारतीय संविधान भेट देऊन एक स्तुत उपक्रम तुपसौन्द्रे कुटुंबाने राबवला आहे. त्यांनी पारंपरिक पद्धतीप्रमाणे भेट वस्तू न देता त्यानी हा आगळा वेगळा उपक्रम राबवला आहे. तसेच लग्नपत्रिका न छापता त्याऐवजी मित्र मंडळी यांना सोशल मीडिया द्वारे निमंत्रक पत्रिका पाठवून निमंत्रक दिले. कारण,पत्रिकेवरील फोटोचा लग्न झाल्यानंतर रद्दी म्हणून वापर केला जातो त्यामुळे त्या फोटोवरील देवदेवतांचा अपमान होतो. तसेच वेळ व पैशांचाही दुरुपयोग होतो. राजनंदिनी व संकेत यांच्या विवाह प्रसंगी वधू पिता राजकुमार तूपसौंद्रे व वर पिता बाळकृष्ण खरात यांच्या या उपक्रमाबद्दल उपस्थित मंडळींनी प्रशंसा केली. महाराष्ट्र राज्य चर्मकार समाजकार्याध्यक्ष नितीन शेरखाने, आमदार कैलास पाटील ,शिवदास उबाळे, रामभाऊ दाभाडे, डी वाय. एस.पी पठाण, सुभाष शिरसागर,वैभव मुंडे,संतोष कटके,रोहिदास गोरे,संतोष सातव, रशीद शेख, प्रदीप उबाळे,सागर उबाळे, दिनेश उबाळे, गणेश रोटे, विजय अवसरे, तुकाराम आधाटे, व अंकुश शिरसागर, राजेश क्षीरसागर , डॉ.कराड, राजू साबळे, सुनील कानडे व इतर समस्त गावकरी मंडळी यावेळी उपस्थित होते.